60

९७११/१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८, कामगार कल्याण विभाग
क्रमांक – काक/३/कावि/२८६/२०१४
दिनांक – २७ ऑक्टोबर २०१४

प्रति,

मा. -------------------------------------

-----------------------------------विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

विषय - कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, महानगरपालिकेच्या विविध कार्यालयातर्गत कामासाठी ठेकेदार नियुक्त करुन त्यांच्या मार्फत नेमणुक केलेल्या कामगारांचा माहे जानेवारी २०११ पासून आज अखेरपर्यंतचा भविष्य निर्वाह निधी भरणे कायदयाने आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून नियुक्त केलेल्या ठेकेदारांनी नेमलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी वेळेत भरला गेला नसल्याने भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने महानगरपालिकेविरुध्द भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील कलम 7 A खाली सन २०१३ पासून सुनावणी चालू केलेली आहे. भविष्य निर्वाह निधी भरल्याबाबतची कागदपत्रे सादर करणेबाबत सुनावणीमध्ये वेळोवेळी मुदतवाढही घेण्यात आलेली आहे. भविष्य निर्वाह निधीबाबत तातडीने पुर्तता करणेबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक २४.०६.२०१४ रोजी परिपत्रक निर्गत केलेले आहे. तथापि संबधीत विभागांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. दिनांक २०.१०.२०१४ रोजी मा. सहा. आयुक्त, भविष्य निर्वाह निधी कार्यालय यांच्यासमोर झालेल्या सुनावणीमध्ये पुढील सुनावणीपर्यंत पुर्तता न केल्यास संबधीत अधिका-यांवर फौजदारी कारवाई सुरु करण्यात येईल अशी स्पष्ट समज देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर कायदयांतर्गत जबाबदार संबधीत विभागप्रमुखांची नांवे प्रप्रत्र 5A मध्ये मागविण्यात आली असून पुर्तता न करणा-या विभाग प्रमुखांवर कारवाई करावी लागेल अशीही समज मा. सहा. आयुक्त, भविष्य निर्वाह निधी कार्यालय यांनी दिलेली आहे.

सबब, उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, आपल्या विभागामार्फत नेमण्यात आलेल्या ठेकेदारांची यादी, ठेकेदारांनी नेमलेल्या कामगारांच्या नांवाची यादी तसेच ज्या ठेकेदारांनी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून स्वतंत्र कोड नंबर प्राप्त करुन घेतलेल्या आहेत अशा ठेकेदारांनी नेमलेल्या कामगांराचा भविष्य निर्वाह निधी संबधीत कार्यालयाकडे भरल्याबाबतची माहे जानेवारी २०११ ते माहे सप्टेंबर २०१४ अखेरची चलने, मासिक हजेरीपत्रक, वार्षीक विवरणपत्रे व ईसीआरची प्रत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील निरिक्षकांस तपासणीसाठी तयार ठेवावीत. तसेच या कागदपत्राची एक स्वतंत्र प्रत कामगार कल्याण विभागाकडे दिनांक १० नोव्हेंबर २०१४ पर्यंत पाठविण्यात यावी. माहिती प्राप्त न झाल्यास होणा-या परिणांमाची जबाबदारी आपल्या विभागावर राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

सल्लागार
भविष्य निर्वाह निधी
कामगार कल्याण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रतिलिपी - १. मा. आयुक्तसाहेब,
माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित...
२. मा. सहा. आयुक्त, कामगार कल्याण विभाग

D:\ks\EPF\7A Notice Hearing.doc